## ॥ श्री ॥

## ॥ बाबा ॥

नाचून गाऊन गुण्या गोविंदे
बाबाभक्ती गोड करु
बाबाभक्तीत आहे आपुले
जीवन गुढ दडलेले, जीवन गुढ दडलेले ॥धृ॥

बाबा आणितात तुझ्यासाठी रे
आकाशीचा तो चंद्र
तरीही देहा विषयी गुंतुनी
विसरशी कसा बाबा नामे॥1॥

देऊनी अग्नी विषयी वासना
मना तू देहरहीत हो रे
सोडून देऊन मोहजाल ते
बाबांशी एकरुप हो रे॥2॥

सतत ह्रदयी मनी चिंतनी
स्मरता बाबानामे
पाहशील तू तूझा तुच रे
काय समाधान मिळे,
बाबा समाधान मिळे ॥3॥

मना उमजुनी सगळे समजूनी
चंचलपणा तू सोड रे
एकलक्ष त्या बाबालक्ष्ये
धनुष्य बाण तू सोड रे ॥4॥

★★★★★